सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन

विधि व न्याय विभाग

सन १९३३ मुंबई अधिनियम क्रमांक २२.

# मुंबई पशुधन सुधारणा अधिनियम, १९३३

( दिनांक ११ जुलै २००६ पर्यंत सुधारित )

## Bombay Act No. XXII of 1933.

# The Bombay Live-Stock Improvement Act, 1933

*( As modified upto the 11th July 2006 )*

व्यवस्थापक, शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई यांच्याद्वारे भारतात मुद्रित आणि संचालक, शासन मुद्रण व लेखनसामग्री, महाराष्ट्र राज्य, मुंबई ४०० ००४ यांच्याद्वारे प्रकाशित

२००६

[ किंमत : रु. ५.०० ]

# मुंबई पशुधन सुधारणा अधिनियम, १९३३

## अनुक्रमणिका


पृष्ठ

उद्देशिका.

कलमे.

| | | |
|---|---|---|
| १. | संक्षिप्त नाव. .. .. .. | १ |
| २. | व्याप्ती. .. .. .. | २ |
| ३. | व्याख्या. .. .. .. | २ |
| ४. | पशुधन अधिकारी. .. .. .. | ३ |
| ५. | पैदाशीच्या कारणासाठी वळू बैल बाळगण्यास मनाई. .. .. | ३ |
| ६. | लायसन्स देणे. .. .. .. | ३ |
| ७. | लायसन्स देण्याचे नाकारणे किंवा ते रद्द करणे. .. .. | ३ |
| ८. | लायसन्सची दुसरी प्रत (डुप्लिकेट) देणे. .. .. .. | ४ |
| ९. | लायसन्सची मुदत. .. .. .. | ४ |
| ९क. | निशाणी न केलेल्या वळू बैलांसंबंधी माहिती देणे. .. .. | ४ |
| १०. | वळू बैलांची तपासणी. .. | ४ |
| ११. | वळू बैल खच्ची करण्याविषयी आदेश देण्याचा अधिकार. . .. | ४ |
| १२. | लायसन्स सादर करण्याचे कर्तव्य. .. .. .. | ५ |
| १३. | या अधिनियमाचे किंवा नियमाचे उल्लंघन करून किंवा लायसन्सवाचून किंवा त्याचे उल्लंघन करून वळू बैल बाळगण्याबद्दल शास्ती. | ५ |
| १४. | कलम ७ किंवा ११ अन्वये दिलेल्या नोटिशीचे पालन करण्यात हयगय किंवा कसूर केल्याबद्दल शास्ती. | ५ |
| १५. | कलम १० किंवा १२ अन्वये केलेल्या मागणीप्रमाणे वर्तन करण्यात हयगय किंवा कसूर केल्याबद्दल शास्ती. | ५ |
| १६. | पशुधन अधिकाऱ्याचा (वळू बैल) खच्ची करण्याचा अधिकार. .. | ६ |
| १७. | वळू बैलाची तपासणी करण्याचा किंवा त्याच्यावर निशाणी करण्याचा किंवा जागेत प्रवेश करण्याचा पशुधन अधिकाऱ्याचा अधिकार. | ६ |
| १७क. | अनधिकृतपणे निशाणी केल्याबद्दल शास्ती. . .. .. | ७ |
| १७ख. | नोंदणी पुस्तके ठेवणे. .. .. .. | ७ |
| १८. | पशुधन अधिकाऱ्यास सहाय्य करण्यास बांधलेले अधिकारी. .. | ७ |
| १९. | या अधिनियमाखालील अपराधांची दखल घेणे. .. .. | ७ |
| २०. | पशुधन अधिकारी हा लोकसेवक असणे. . . .. .. | ७ |

## अनुक्रमणिका


| कलमे. | | पृष्ठ |
|---|---|---|
| २१. | सद्भावनापूर्वक काम करणाऱ्या व्यक्तींनी संरक्षण व दावे व खटले दाखल करण्याची मुदत. | ७ |
| २२. | फेरतपासणी. .. .. .. | ८ |
| २३. | राज्य शासनाचा नियम करण्याचा अधिकार. .. .. | ८ |
| २४. | या अधिनियमाच्या तरतुदी वळू रेड्यांस लागू करण्याचा राज्य शासनाचा अधिकार. | ९ |
| २४ क. | पशुपालन व पशुवैद्यक संचालक यांची कृत्ये वैध ठरविणे. | १० |
| २५. | सन १९५० चा मध्यप्रांत व वऱ्हाडचा अधिनियम क्रमांक २० रद्द करणे व बचाव. | १० |

# सन १९३३ चा मुंबई अधिनियम क्रमांक २२[1].

## ( मुंबई पशुधन सुधारणा अधिनियम, १९३३.)

**( १ डिसेंबर १९३३. )**

या अधिनियमात पुढील आदेश व अधिनियम यांअन्वये अनुकूलन, रूपभेद व सुधारणा करण्यात आल्या आहेत :—

भारतीय विधि अनुकूलन परिषद आदेश.

विधि अनुकूलन आदेश, १९५०.

सन १९५० चा मुंबई अधिनियम क्रमांक ३५.

सन १९५४ चा मुंबई अधिनियम क्रमांक ५०.

मुंबई विधि अनुकूलन (राज्य समवर्ती विषय) आदेश, १९५६.

मुंबई विधि अनुकूलन (राज्य व समवर्ती विषय) आदेश, १९६०.

सन १९६२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ५.

सन १९६२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४८.

### पशुधन सुधारण्यासाठी तरतूद करण्याबाबत अधिनियम

**ज्याअर्थी,** या अधिनियमात तरतूद केलेल्या रीतीने पशुधनाची सुधारणा करण्यासाठी तरतूद करणे इष्ट आहे ; [2][***]

**त्याअर्थी,** याअन्वये पुढीलप्रमाणे अधिनियम करण्यात येत आहे :—

**१.** या अधिनियमास, मुंबई पशुधन सुधारणा अधिनियम, १९३३, असे म्हणावे. संक्षिप्त नाव.

**२.** [3][(१)] (क) कलम १ व हे कलम ही दोन्ही [4][सबंध महाराष्ट्र राज्यास] लागू आहे. व्याप्ती.

(ख) (एक) [5][याबाबत राज्य शासनाने अधिकृत केलेल्या अधिकाऱ्याच्या] पूर्वसंमतीने [6][जिल्हा परिषदेने, किंवा, यथास्थिति, पंचायत समितीच्या] अथवा

(दोन) [6][जिल्हा परिषदेने, किंवा, यथास्थिति, पंचायत समितीच्या] पूर्वसंमतीने [7][अशा अधिकाऱ्याने] केलेल्या लेखी अर्जावरून [8][[9][राज्य] शासनास [10]**[राजपत्रात]** प्रसिद्ध केलेल्या अधिसूचनेद्वारे असा

---

[1] उद्देश व कारणे यांच्या निवेदनासाठी, **मुंबई शासन राजपत्र,** १९३३, भाग चार पृ.१०००-१००१ पहा आणि परिषदेतील कामकाजविषयक वृत्तासाठी मुंबई विधानपरिषद चर्चा, १९३३ चा खंड ३८ पहा.

[2] सन १९६२ चा महाराष्ट्र अधिनियम, ४८ याच्या कलम २ द्वारे " आणि ज्याअर्थी, प्रस्तुत अधिनियम " या शब्दांनी सुरू होणारा व " पूर्व मंजुरी मिळविण्यात आली आहे " या शब्दांनी संपणारा मजकूर वगळण्यात आला.

[3] वरील अधिनियमाच्या कलम ३ द्वारे मूळ मजकुराला (१) असा नवीन क्रमांक देण्यात आला.

[4] वरील अधिनियमाच्या कलम २ (१) (अ) अन्वये मूळ मजकुराऐवजी हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

[5] सन १९५० चा मुंबई अधिनियम, ३५ याच्या कलम २ द्वारे मूळ मजकुराऐवजी हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

[6] सन १९६२ चा महाराष्ट्र अधिनियम, ४८ याच्या कलम (३) (१) (ब) अन्वये मूळ मजकुराऐवजी हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

[7] सन १९५० चा मुंबई अधिनियम, ३५ याच्या कलम २ द्वारे मूळ मजकुराऐवजी हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

[8] भारतीय विधि अनुकूलन परिषद आदेशाद्वारे हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

[9] विधि अनुकूल आदेश १९५० द्वारे मूळ मजकुराऐवजी हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

[10] भारतीय विधि अनुकूलन परिषद आदेशाद्वारे मूळ मजकुराऐवजी हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

निदेश देण्याचा अधिकार आहे की, या अधिनियमाच्या तरतुदी, [१][राज्यातील] ज्या गावाबाबत असा अर्ज करण्यात आला असेल अशा कोणत्याही गावास लागू होतील.

(ग) कलम १ व हे कलम ही दोन्ही ताबडतोब अंमलात येतील आणि या अधिनियमाच्या तरतुदी राज्य शासन, [२][**राजपत्रात**] प्रसिद्ध केलेल्या अधिसूचनेद्वारे जो दिनांक नेमील त्या दिनांकास पोट-कलम (ख) अन्वये [१][राज्यातील] ज्या कोणत्याही गावास उक्त तरतुदी लागू केल्या असतील त्या गावात अंमलात येतील.

[३][(२) राज्यातील ज्या गावास या अधिनियमाच्या बाकीच्या तरतुदी लागू करण्याचे योजिले आहे, अशा कोणत्याही गावातील वळू बैलांची संख्या व राज्य शासनाकडून त्या गावास पैदाशीच्या कारणासाठी पुरविण्यात येतील अशा वळू बैलांची संख्या ही, त्या गावात त्या जातीच्या जनावरांच्या वाढीचे प्रमाण कायम ठेवण्यास पुरेशी होईल याबद्दल राज्य शासनाची खात्री झाल्याशिवाय मुंबई पशुधन सुधारणा (व्याप्ती व सुधारणा) अधिनियम, १९६२ याच्या प्रारंभानंतर, पोट-कलम (१) चा खंड (ब) अन्वये कोणतीही अधिसूचना काढता कामा नये.] १९६२ चा महा. ३८.

व्याख्या. **३.** विषयात किंवा संदर्भात एतद्विरुद्ध काही नसल्यास, या अधिनियमात,—

(१) " गाय " या संज्ञेत कालवडीचा समावेश होतो ;

[४][* * *]

(३) " लायसन्स " याचा अर्थ, कलम ६ अन्वये दिलेले लायसन्स असा आहे ;

(४) " पशुधन अधिकारी " याचा अर्थ, कलम ४ अन्वये नेमलेला किंवा अधिकार दिलेला अधिकारी किंवा व्यक्ती, असा आहे ;

[५][(४ क) पंचायत समिति, याचा अर्थ, महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम, १९६१ याच्या कलम ५७ अन्वये रचना केलेली पंचायत समिती, असा आहे ;] १९६२ चा महा. ५.

(५) " विहित " या शब्दाचा अर्थ, व्याकरणदृष्ट्या त्यांत होणारे फेरफार धरून नियमाअन्वये विहित केलेले, असा आहे ;

(६) " नियम " याचा अर्थ, कलम २३ अन्वये केलेले नियम, असा आहे ;

[६][(७) " गाव " म्हणजे,—

(क) महाराष्ट्र राज्याच्या मुंबई प्रदेशाच्या संबंधात, मुंबई जमीन महसूल अधिनियम, १८७९ यात व्याख्या केल्याप्रमाणे असलेले गाव ; १८७९ चा मुंबई ५.

(ख) महाराष्ट्र राज्याच्या विदर्भ विभागाच्या संबंधात, मध्यप्रदेश भू-राजस्व संहिता, १९५४ मध्ये व्याख्या केल्याप्रमाणे असलेले गाव ; आणि १९५१ चा मध्यप्रदेश १२.

---

[१] सन १९६२ चा महाराष्ट्र अधिनियम, ४८ याच्या कलम ३ (१) (ब) (दोन) द्वारे हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

[२] भारतीय विधि अनुकूलन परिषद आदेशाद्वारे मूळ मजकुराऐवजी हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

[३] सन १९६२ चा महाराष्ट्र अधिनियम, ४८ याच्या कलम ३ (२) द्वारे हे पोट-कलम समाविष्ट करण्यात आले.

[४] सन १९५० चा मुंबई अधिनियम, ३५ याच्या कलम २ द्वारे हा खंड वगळण्यात आला.

[५] सन १९६२ चा मुंबई अधिनियम, ४८ याच्या कलम ४ (१) द्वारे खंड (४ क) समाविष्ट करण्यात आला.

[६] वरील अधिनियमाच्या कलम ४ (२) द्वारे खंड (७) आणि (७ क) समाविष्ट करण्यात आले.

१३१७ फसली चा हैद्राबाद ७. (ग) महाराष्ट्र राज्याच्या हैदराबाद प्रदेशाच्या संबंधात, हैदराबाद जमीन महसूल अधिनियमात व्याख्या केल्याप्रमाणे असलेले गाव ;

१९६२ चा महा. ५. (७क) " जिल्हा परिषद " या संज्ञेचा अर्थ, महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम, १९६१ याच्या कलम ९ अन्वये रचना केलेली जिल्हा परिषद, असा आहे ; आणि]

(८) एखाद्या व्यक्तीच्या मालकीचा वळू बैल असेल किंवा अशा व्यक्तीच्या कब्जात किंवा ताब्यात असा वळू बैल असेल तर, " अशा व्यक्तीने वळू बैल बाळगला आहे " असे म्हणता येईल.

[१][**४.** राज्य शासनास, **राजपत्रात** प्रसिद्ध केलेल्या अधिसूचनेद्वारे, कोणत्याही अधिकाऱ्यास [२][किंवा व्यक्तीस] पशुधन अधिकारी म्हणून नेमण्याचा आणि त्यास योग्य वाटतील असे या अधिनियमाअन्वये असलेले अधिकार व कर्तव्ये अशा अधिकाऱ्यास [२][किंवा व्यक्तीस] नेमून देण्याचा अधिकार आहे.] पशुधन अधिकारी.

**५.** कलम ६ अन्वये दिलेल्या लायसन्सच्या अटी, शर्ती व निर्बंध यांअन्वये व तद्नुसार असेल ते खेरीज करून, कोणत्याही व्यक्तीने, विहित करण्यात आलेल्या वयाचा कोणताही वळू बैल बाळगता कामा नये. पैदाशीच्या कारणासाठी वळू बैल बाळगण्यास मनाई.

**६.** वळू बैल बाळगण्यासाठी आवश्यक असलेले प्रत्येक लायसन्स हे, [३][[४][राज्य] शासनाने] याबाबत सामान्य किंवा विशेष आदेशाद्वारे अधिकृत केलेल्या पशुधन अधिकाऱ्याकडून, विहित करण्यात येईल अशा नमुन्याप्रमाणे, अशा मुदतीसाठी व अशा अटी, शर्ती व निर्बंध यांस अधीन राहून देण्यात येईल : लायसन्स देणे.

परंतु, लायसन्स देण्यासाठी कोणतीही फी आकारता कामा नये.

**७.** (१) लायसन्स देण्याचा अधिकार असलेल्या पशुधन अधिकाऱ्याच्या मते, वळू बैल हा,— लायसन्स देण्याचे नाकारणे किंवा ते रद्द करणे.

(क) व्यंगयुक्त किंवा किरकोळ बांध्याचा असून त्यापासून व्यंगे असलेली किंवा हलक्या प्रतीची पैदास निर्माण होण्याचा संभव असेल ; अथवा

(ख) कोणत्याही सांसर्गिक किंवा संक्रामिक रोगाने कायमचा पीडलेला असेल ; अथवा

(ग) पैदास करण्याच्या कारणासाठी अयोग्य होईल अशा कोणत्याही इतर रोगाने कायमचा पीडलेला असेल ;

तर, अशा अधिकाऱ्यास, नियमास अधीन राहून, लायसन्स देण्याचे नाकारण्याचा किंवा ते रद्द करण्याचा अधिकार आहे.

(२) लायसन्सच्या अटी व शर्ती यांपैकी कोणत्याही अटींचा किंवा शर्तींचा कोणत्याही प्रकारे भंग झाला आहे असे लायसन्स देणाऱ्या पशुधन अधिकाऱ्याचे मत होईल तर, त्यास असे लायसन्स रद्द करण्याचाही अधिकार आहे.

[१] सन १९५० चा मुंबई अधिनियम क्रमांक ३५ याच्या कलम ४ द्वारे मूळ कलम ४ ऐवजी समाविष्ट करण्यात आले.

[२] सन १९६२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ५ याच्या कलम २८६, दहावी अनुसूची द्वारे हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

[३] भारतीय विधि अनुकूलन परिषद आदेशाद्वारे हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

[४] विधि अनुकूलन आदेश, १९५० द्वारे " प्रांतिक " या मजकुराऐवजी हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

(३) पोट-कलम (१) किंवा (२) अन्वये लायसन्स रद्द करण्यात आल्याबद्दल कोणत्याही व्यक्तीस कोणतीही नुकसानभरपाई मिळण्याचा हक्क असणार नाही.

(४) पोट-कलम (१) किंवा (२) अन्वये लायसन्स रद्द करण्यात आले तर, लायसन्स रद्द करणाऱ्या पशुधन अधिकाऱ्याने वळू बैलाच्या मालकास किंवा लायसन्स मालक म्हणून लायसन्समध्ये निर्दिष्ट केलेल्या व्यक्तीस तशा अर्थाची नोटीस दिली पाहिजे आणि लायसन्सबाबत दिलेल्या कोणत्याही अशा नोटिशीत लायसन्स रद्द करण्याची कारणे नमूद केलेली असली पाहिजेत.

[१][* * * *]

लायसन्सची दुसरी प्रत (डुप्लिकेट) देणे.

**८.** कलम ६ अन्वये दिलेले लायसन्स हरवले किंवा नष्ट झाले याविषयी लायसन्स देणाऱ्या पशुधन अधिकाऱ्याची खात्री होईल तेव्हा, अशा अधिकाऱ्यास, विहित करण्यात येतील अशा शर्तींस अधीन राहून, असे लायसन्स धारण करणाऱ्यास त्या लायसन्सची दुसरी प्रत (डुप्लिकेट) देण्याचा अधिकार आहे ; आणि त्यानंतर लायसन्ससंबंधी या अधिनियमाच्या सर्व तरतुदी अशा दुसऱ्या प्रतीस, जणू ती प्रत मूळचे लायसन्स आहे असे समजून, लागू होतील.

लायसन्सची मुदत.

**९.** वळू बैल बाळगण्याबाबत दिलेले लायसन्स—

(क) त्यात निर्दिष्ट केलेली मुदत संपेपर्यंत, अथवा

(ख) या अधिनियमाअन्वये ते रद्द करण्यात येईपर्यंत, अथवा

(ग) असा वळू बैल मरण पावेतो किंवा विहित केलेल्या रीतीने त्यास खच्ची करण्यात येईपर्यंत,

अंमलात राहील.

निशाणी न केलेल्या वळू बैलासंबंधी माहिती देणे.

[२][**९-क.** कलम २, पोट-कलम (१) चा खंड (ग) अन्वये अधिसूचना काढल्याच्या दिनांकास, या अधिनियमान्वये विहित केलेली विशिष्ट निशाणी न केलेला कोणताही वळू बैल ज्याच्या ताब्यात असेल किंवा त्या दिनांकानंतर कोणत्याही वेळी असा कोणताही वळू बैल ज्याच्या ताब्यात येईल असा प्रत्येक व्यक्तीने, असा वळू बैल आपल्या ताब्यात असल्याबद्दलची माहिती विहित करण्यात येईल अशा मुदतीत पशुधन अधिकाऱ्यास दिली पाहिजे.]

वळू बैलांची तपासणी.

**१०.** वळू बैल बाळगणाऱ्या कोणत्याही व्यक्तीने, असा वळू बैल त्या त्या वेळी ज्या ठिकाणी असेल त्या ठिकाणी किंवा कोणत्याही इतर योग्य ठिकाणी कोणत्याही वाजवी वेळी हजर करण्याविषयी कोणत्याही पशुधन अधिकाऱ्याकडून फर्माविण्यात येईल तेव्हा, अशा अधिकाऱ्याकडून तपासणी केली जाण्यासाठी अशा ठिकाणी व अशा वेळी तो हजर केला पाहिजे आणि तपासणीचे कारणासाठी अशा अधिकाऱ्यास सर्व वाजवी मदत केली पाहिजे.

वळू बैल खच्ची करण्याविषयी आदेश देण्याचा अधिकार.

**११.** (१) कोणत्याही पशुधन अधिकाऱ्यास, विहित केलेल्या रीतीने बजावलेल्या नोटिशीद्वारे असे फर्माविण्याचा अधिकार आहे की, नोटीस बजावल्याच्या दिनांकास जो वळू बैल विहित केलेल्या वयाचा झाला असेल आणि ज्याच्या बाबतीत या अधिनियमाअन्वये दिलेले कोणतेही लायसन्स त्यावेळी अंमलात नसेल असा कोणताही वळू बैल, नोटीस अंमलात आल्यानंतर एक महिन्याच्या आत विहित केलेल्या रीतीने खच्ची करण्यात आला पाहिजे: असे खच्ची करण्याचे काम, वळू बैलाच्या मालकाची किंवा तो बाळगणाऱ्या इतर व्यक्तीची इच्छा असल्यास, पशुधन अधिकाऱ्याने कोणतीही आकार न घेता केले पाहिजे किंवा करविले पाहिजे.

---

[१] सन १९५० चा मुंबई अधिनियम ३५ याच्या कलम ५ अन्वये, पोट-कलम (५) वगळण्यात आले.

[२] सन १९६२ चा महा. अधिनियम क्रमांक ४८ याच्या कलम ५ द्वारे कलम ९-क समाविष्ट करण्यात आले.

(२) या कलमाच्या प्रयोजनांकरिता वळू बैलाच्या मालकावर किंवा वळू बैल बाळगणाऱ्या कोणत्याही इतर व्यक्तीवर नोटीस बजावली पाहिजे.

[1][* * * *]

लायसन्स सादर करण्याचे कर्तव्य.

**१२.** वळू बैलाबाबत दिलेले लायसन्स अंमलात असेल तर, असे लायसन्स,—

(क) त्या त्या वेळी वळू बैल जेथे असेल त्या ठिकाणी पशुधन अधिकाऱ्याने किंवा याबाबत [2][[3][राज्य] शासनाने] सामान्य किंवा विशेष आदेशाद्वारे अधिकृत केलेल्या [4][कोणत्याही इतर अधिकाऱ्याने] मागणी केली असता वाजवी वेळेच्या आत,

(ख) गाय ताब्यात असणाऱ्या व्यक्तीने मागणी केली असता, गाईस बैल दाखविण्यात येण्यापूर्वी,

सादर करणे हे त्या त्यावेळी जी कोणतीही व्यक्ती वळू बैल बाळगीत असेल तिचे कर्तव्य असेल.

या अधिनियमाचे किंवा नियमांचे उल्लंघन करून किंवा लायसन्स वाचून किंवा त्याचे उल्लंघन करून वळू बैल बाळगण्याबद्दल शास्ती.

**१३.** जी कोणतीही व्यक्ती, या अधिनियमाचे किंवा या अधिनियमाअन्वये केलेल्या कोणत्याही नियमाचे किंवा दिलेल्या कोणत्याही आदेशाचे किंवा लायसन्सच्या कोणत्याही अटींचे, शर्तींचे किंवा निर्बंधांचे उल्लंघन करून वळू बैल बाळगील तो, दोषी ठरविण्यात आली असता [5][तिला दोषी ठरविण्यात आले असता, पहिल्या अपराधाबद्दल पंचवीस रुपयांपर्यंतच्या द्रव्यदंडाची आणि दुसऱ्या किंवा त्यानंतरच्या अपराधाबद्दल पन्नास रुपयांपर्यंतच्या द्रव्यदंडाची शिक्षा होईल.]

कलम ७ किंवा ११ अन्वये दिलेल्या नोटिशीचे पालन करण्यात हयगय किंवा कसूर केल्याबद्दल शास्ती.

**१४.** जी कोणतीही व्यक्ती, कलम ७ किंवा ११ यास अनुसरून बजाविलेल्या नोटिशीचे पालन करण्यात हयगय किंवा कसूर करील ती दोषी ठरविण्यात आली असता, २५ रुपयांपर्यंतच्या द्रव्यदंडाच्या शिक्षेस पात्र होईल.

कलम १० किंवा १२ अन्वये केलेल्या मागणीप्रमाणे वर्तन करण्यात हयगय किंवा कसूर केल्याबद्दल शास्ती.

**१५.** जी कोणतीही व्यक्ती, कलम १० अन्वये तपासणीसाठी वळू बैल हजर करण्याविषयी पशुधन अधिकाऱ्याने फर्माविले असता तपासणीसाठी वळू बैल हजर करण्यात हयगय किंवा कसूर करील किंवा जी कोणतीही व्यक्ती, कलम १२ च्या तरतुदीस अनुसरून लायसन्स हजर करण्याविषयी फर्माविले असता तसे करण्यात कसूर करील ती, दोषी ठरविण्यात आली असता, २५ रुपयांपर्यंतच्या द्रव्यदंडाच्या शिक्षेस पात्र होईल.

---

[1] सन १९५० चा मुंबई अधिनियम क्रमांक ३५ याच्या कलम ६ अन्वये मूळ मजकूर वगळण्यात आला.

[2] भारतीय विधि अनुकूलन परिषद आदेशाद्वारे मूळ मजकुराऐवजी हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

[3] विधि अनुकूलन आदेश, १९५० द्वारे "प्रातिक" या शब्दांऐवजी हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

[4] सन १९५० चा मुंबई अधिनियम क्रमांक ३५ याच्या कलम ७ अन्वये मूळ मजकुराऐवजी हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

[5] सन १९६२ चा महा. अधिनियम क्रमांक ४८ याच्या कलम ६ अन्वये हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

पशुधन अधिकाऱ्याचा (वळू बैल) खच्ची करण्याचा अधिकार.

**१६.** (१) जेव्हा जेव्हा कलम १५ अन्वये अपराध करण्यात आला असेल किंवा जेव्हा जेव्हा कलम ११ अन्वये बजावलेल्या नोटिशीस अनुसरून कोणताही वळू बैल खच्ची करण्यात आला नसेल तेव्हा तेव्हा यथास्थिति, ज्याच्या संबंधांत असा अपराध करण्यात आला असेल किंवा अशी नोटीस बजावण्यात आली असेल तो वळू बैल विहित केलेल्या रीतीने खच्ची करण्याचा किंवा करविण्याचा पशुधन अधिकाऱ्यास अधिकार आहे. असे खच्ची करण्याचे काम पशुधन अधिकाऱ्याने कोणताही आकार न घेता केले पाहिजे किंवा करविले पाहिजे.

(२) तसेच, जो कोणताही वळू बैल, त्या त्या वेळी ज्याच्या मालकीचा असेल किंवा ज्याच्या कब्जात किंवा ताब्यात असेल ती व्यक्ती माहित नसल्यास किंवा विहित केलेल्या रीतीने चौकशी केल्यानंतर ती कोण हे नक्की सांगता येत नसल्यास, असा वळू बैल धरण्याचा पशुधन अधिकाऱ्यास अधिकार आहे. वळू बैल अशा रीतीने धरल्यानंतर पशुधन अधिकाऱ्याचे असे मत होईल की, असा वळू बैल विहित केलेल्या वयाचा झाला आहे किंवा कलम ७ मध्ये निर्दिष्ट केलेले कोणतेही व्यंग किंवा कोणताही रोग त्यास झाला आहे तर, असा वळू बैल—

(क) विहित केलेल्या रीतीने खच्ची करण्यात आला पाहिजे ; आणि

(ख) जाहीर लिलावाने विकण्यात आला पाहिजे किंवा पांजरपोळात पाठविण्यात आला पाहिजे. असा निदेश देण्याचा पशुधन अधिकाऱ्यास अधिकार आहे :

परंतु, अशा वळू बैलाचा मालक त्या वळू बैलास अशा रीतीने धरल्यापासून पंधरा दिवसांच्या आत हजर होईल व असा वळू बैल आपल्या मालकीचा आहे, असे पशुधन अधिकाऱ्याची खात्री होईल अशा रीतीने सिद्ध करील तर, असा वळू बैल—

(एक) जर त्यास जाहीर लिलावाने विकण्यात आले नसेल, किंवा

(दोन) तो पांजरपोळात पाठविण्यात आला असेल

तर, अशा वळू बैलाचे पोषण करण्यासाठी झालेला व विहित केलेल्या रीतीने निश्चित केलेला आकार व खर्च देण्यात आल्यावर अशा मालकाच्या स्वाधीन केला पाहिजे, अथवा

(तीन) जर त्यास जाहीर लिलावाने विकण्यात आले असेल तर, अशी विक्री करून मिळालेल्या पैशांतून अशा वळू बैलाचे पोषण व त्याची विक्री या कामी झालेला व विहित केलेल्या रीतीने निश्चित केलेला खर्च वजा करून शिल्लक राहिलेली रक्कम अशा वळू बैलाच्या मालकास देण्यात आली पाहिजे.

वळू बैलाची तपासणी करण्याचा किंवा त्याच्यावर निशाणी करण्याचा किंवा जागेत प्रवेश करण्याचा पशुधन अधिकाऱ्याचा अधिकार.

**१७.** या अधिनियमाच्या प्रयोजनांकरिता पशुधन अधिकाऱ्यास, सर्व वाजवी वेळी, पुढील गोष्टी करण्याचा अधिकार आहे :—

(क) कोणत्याही वळू बैलाची तपासणी करणे ;

(ख) कोणत्याही वळू बैलावर विहित केलेल्या रीतीने कोणतीही विहित निशाणी करणे ;

(ग) जेथे वळू बैल ठेवण्यात आला आहे असे त्यास सकारण वाटत असेल अशा कोणत्याही जागेत किंवा ठिकाणी विहित केलेल्या रीतीने प्रवेश करणे.

[१][१७ क. जी कोणतीही व्यक्ती, वैध प्राधिकाराशिवाय कोणत्याही वळू बैलावर या अधिनियमान्वये विहित केलेली कोणतीही निशाणी करील किंवा विहित केलेल्या निशाणीसारखी दिसणारी कोणतीही निशाणी त्या सादृश्यामुळे फसवणूक करण्याच्या हेतूने करील किंवा करवील तिला, दोषी ठरविण्यात आले असता, तीन महिन्यांपर्यंतच्या मुदतीच्या कैदेची शिक्षा किंवा पाचशे रुपयांपर्यंतच्या द्रव्यदंडाची शिक्षा होईल. अनधिकृतपणे निशाणी केल्याबद्दल शास्ती.

१७ ख. प्रत्येक पशुधन अधिकाऱ्याने या अधिनियमान्वये वळू बैलांची तपासणी, त्यांना खच्ची करणे आणि त्यांच्यावर निशाणी करणे यासंबंधींचा तपशील व विहित करण्यात येईल असा इतर तपशील असलेले एक नोंदणीपुस्तक विहित करण्यात येईल अशा नमुन्यात ठेवले पाहिजे व ते चालू ठेवले पाहिजे.] नोंदणी पुस्तके ठेवणे.

१८. सर्व ग्राम-अधिकारी, [२][[३][राज्य] शासनाला] उपयुक्त असलेले सर्व ग्रामसेवक आणि महसूल, [४][शेती, पशुपालन व पशुवैद्यक या विभागांचे किंवा राज्य शासन निर्दिष्ट करील अशा इतर विभागाचे] सर्व अधिकारी हे पुढील गोष्टी करण्यास बांधलेले असतील :— पशुधन अधिकाऱ्यास सहाय्य करण्यास बांधलेले अधिकारी.

(क) या अधिनियमाअन्वये शिक्षापात्र असलेला अपराध करण्यात आला आहे किंवा असा अपराध करण्याचा एखाद्या व्यक्तीचा इरादा आहे किंवा तिने तशी तयारी केली आहे याविषयी माहिती मिळाल्यास त्याची खबर पशुधन अधिकाऱ्यास ताबडतोब देणे ;

(ख) जो अपराध केला जाण्याच्या बेतात आहे असे त्यास माहीत असेल किंवा सकारण वाटत असेल असा कोणताही अपराध होऊ नये म्हणून त्यांच्या अधिकारपरत्वे त्यास करता येण्याजोगे सर्व वाजवी उपाय करणे ; आणि

(ग) या अधिनियमाच्या तरतुदी अंमलात आणण्याच्या कामी कोणत्याही पशुधन अधिकाऱ्यास सहाय्य देणे.

१९. पशुधन अधिकाऱ्याकडून किंवा अशा अधिकाऱ्याने याबाबत अधिकृत केलेल्या कोणत्याही व्यक्तीकडून तक्रार आल्याखेरीज या अधिनियमाखालील कोणत्याही अपराधाची कोणत्याही न्यायालयाने दखल घेता कामा नये. या अधिनियमाखालील अपराधांची दखल घेणे.

१८६० चा ४५. २०. प्रत्येक पशुधन अधिकारी हा, भारतीय दंड संहिता, कलम २१ च्या अर्थानुसार लोकसेवक आहे असे समजले पाहिजे. पशुधन अधिकारी हा, लोकसेवक असणे.

२१. (१) हा अधिनियम किंवा नियम याअन्वये सद्भावनापूर्वक केलेल्या किंवा जे करण्याचा इरादा आहे अशा कोणत्याही कृत्याबद्दल कोणत्याही व्यक्तीविरुद्ध कोणताही दावा, खटला किंवा इतर वैध कारवाई दाखल करता कामा नये. सद्भावनापूर्वक काम करणाऱ्या व्यक्तींनी संरक्षण व दावे व खटले दाखल करण्याची मुदत.

---

[१] सन १९६२ चा महाराष्ट्र अधिनियम, क्रमांक ४८ याच्या कलम ७ द्वारे कलम १७-क आणि १७-ख समाविष्ट करण्यात आले.

[२] भारतीय विधि अनुकूलन आदेशाद्वारे हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

[३] विधि अनुकूलन आदेश, १९५० द्वारे "प्रांतिक" या मजकुराऐवजी हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

[४] सन १९५० चा मुंबई अधिनियम क्रमांक ३५ याच्या कलम ८ अन्वये हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

(२) या अधिनियमाअन्वये केलेल्या किंवा करण्यात आले आहे असे मानण्यात आलेल्या कोणत्याही कृत्याच्या संबंधात [१][[२][राज्य] शासना] विरुद्ध कोणताही दावा, आणि कोणत्याही पशुधन अधिकाऱ्याविरुद्ध कोणताही खटला किंवा दावा हा, असा दावा किंवा खटला ज्या कृत्याविषयी तक्रार असलेले कृत्य घडल्याच्या दिनांकापासून चार महिन्यांच्या आत दाखल करण्यात आलेला नसल्यास, चालविता कामा नये किंवा चालविता येणार नाही.

फेरतपासणी.

**२२.** पशुधन अधिकाऱ्याने दिलेल्या कोणत्याही आदेशाची वैधता व औचित्य याविषयी तसेच अशा अधिकाऱ्याने चालविलेले कामकाज व्यवस्थित होते किंवा कसे याविषयी स्वतःची खात्री करून घेण्यासाठी [१][[२][राज्य] शासनास] अशा आदेशाचे किंवा कामकाजाचे कागदपत्र मागविण्याचा व त्यांची तपासणी करण्याचा अधिकार आहे. जर कोणत्याही बाबतीत अशा रीतीने ज्या कोणत्याही आदेशासंबंधीचे किंवा कामकाजासंबंधीचे कागदपत्र मागविण्यात आले असतील त्या आदेशात किंवा कामकाजात फेरफार केला पाहिजे, ते रद्द केले पाहिजे किंवा फिरविले पाहिजे असे [१][[२][राज्य] शासनास] वाटत असेल तर, त्यास योग्य वाटेल त्याप्रमाणे आदेश देण्याचा अधिकार आहे.

[१][राज्य] शासनाचा नियम करण्याचा अधिकार.

**२३.** (१) या अधिनियमाची तरतूद अंमलात आणण्याच्या प्रयोजनासाठी [१][[२][राज्य] शासनास] नियम करण्याचा अधिकार आहे.

(२) विशेषकरून व वरील तरतुदीच्या सामान्यतेस बाध येऊ न देता, पुढील सर्व किंवा त्यांपैकी कोणत्याही प्रयोजनांसाठी असे नियम करण्याचा अधिकार आहे :—

(क) कलम ४ अन्वये पशुधन अधिकाऱ्याने जे अधिकार चालविले पाहिजेत व जी कर्तव्ये बजावली पाहिजेत ते अधिकार व ती कर्तव्ये विहित करणे व तसेच असे अधिकार व कर्तव्य सोपविणे,

(ख) कलम ५ अन्वये ज्या वयानंतर वळू बैल लायसन्सशिवाय बाळगता कामा नये ते विहित करणे,

(ग) कलम ६ अन्वये लायसन्सचा नमुना व ते ज्या रीतीने, ज्या अटींवर, ज्या शर्तीवर, जे निर्बंध घालून देण्यात आले पाहिजे, हस्तांतरित करण्यात आले पाहिजे, किंवा नव्याने करून देण्यात आले पाहिजे ती रीत, त्या अटी, शर्ती व निर्बंध ही विहित करणे,

(घ) कलम ७ अन्वये ज्या शर्तीस अधीन राहून, लायसन्स रद्द करता येईल त्या शर्ती विहित करणे,

(ङ) कलम ७ व ११ या अन्वये, नोटीस ज्या रीतीने बजावण्यात आली पाहिजे ती रीत विहित करणे,

(च) कलम ८ अन्वये ज्या शर्तीस अधीन राहून, लायसन्सची दुसरी प्रत देता येईल त्या शर्ती विहित करणे,

[३][(चच) कलम ९ क अन्वये खूण करण्यासाठी विशिष्ट निशाणी विहित करणे आणि अशी निशाणी न केलेले वळू बैल ताब्यात असल्याबद्दलची माहिती ज्या मुदतीत पशुधन अधिकाऱ्यास दिली पाहिजे ती मुदत विहित करणे,]

---

[१] भारतीय विधि अनुकूलन परिषद आदेशाद्वारे हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.
[२] विधि अनुकूलन आदेश, १९५० द्वारे हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.
[३] सन १९६२ चा महाराष्ट्र अधिनियम, ४८ याच्या कलम ८ (१) अन्वये हा खंड समाविष्ट करण्यात आला.

(छ) कलम ११ व १६ अन्वये, ज्या रितीने वळू बैलास खच्ची करण्यात आले पाहिजे ती रीत, व ज्या रितीने वळू बैलांच्या मालकीसंबंधी चौकशी केली पाहिजे व ज्या रितीने वळू बैलाचे पोषण व विक्री यांच्या कामी येणारा आकार व खर्च निश्चित करण्यात आला पाहिजे ती रीत विहित करणे,

(ज) कलम १७ अन्वये ज्या रितीने व नमुन्याप्रमाणे वळू बैलावर निशाणी करण्यात आली पाहिजे ती रीत व नमुना विहित करणे आणि ज्या रितीने कोणत्याही जागेत किंवा इतर ठिकाणी पशुधन अधिकाऱ्याने प्रवेश केला पाहिजे ती रीत विहित करणे.

[१][(झ) कलम १७ ख अन्वये पशुधन अधिकाऱ्याने ज्या नमुन्यात नोंदणीपुस्तक ठेवले पाहिजे तो नमुना आणि अशा नोंदणीपुस्तकात भरावयाचा तपशील विहित करणे.]

[२][(२ क) कोणतेही नियम करताना राज्य शासनाला अशी तरतूद करता येईल की, अशा नियमांचा भंग केल्याबद्दल, दोषी ठरविण्यात आले असता, पन्नास रुपयांपर्यंतच्या द्रव्यदंडाची शिक्षा होईल.];

(३) या कलमाअन्वये केलेले नियम, ते कायम करण्यापूर्वी [३][**राजपत्रात**] आगाऊ प्रसिद्ध करण्यात आले पाहिजेत.

[४][(४) या कलमान्वये केलेला प्रत्येक नियम, तो करण्यात आल्यानंतर, शक्य असेल तितक्या लवकर, राज्य विधानमंडळाचे अधिवेशन चालू असताना एकाच अधिवेशनात किंवा लागोपाठच्या दोन अधिवेशनात एकूण तीस दिवसांची होईल इतक्या मुदतीकरिता राज्य विधानमंडळाच्या प्रत्येक सभागृहापुढे ठेवण्यात आला पाहिजे; आणि ज्या अधिवेशनात तो अशा रितीने ठेवण्यात आला असेल ते अधिवेशन किंवा त्याच्या लगतनंतरचे अधिवेशन समाप्त होण्यापूर्वी त्या नियमात कोणताही फेरफार करण्यास दोन्ही सभागृहे सहमत होतील किंवा नियम करण्यात येऊ नये म्हणून दोन्ही सभागृहे सहमत होतील तर, तो नियम अशा निर्णयाची अधिसूचना **राजपत्रात** प्रसिद्ध झाल्याच्या दिनांकापासून केवळ अशा सुधारलेल्या स्वरूपातच अंमलात येईल, किंवा, यथास्थिति, तो नियम अंमलात येणार नाही; तथापि, उक्त नियमात अशा रितीने कोणतेही फेरफार केल्यामुळे किंवा तो नियम रद्द केल्यामुळे त्या नियमान्वये पूर्वी केलेल्या किंवा करण्याचे राहून गेलेल्या कोणत्याही गोष्टीच्या वैधतेस बाध येणार नाही.]

या अधिनियमाच्या तरतुदी वळू, रेड्यांस लागू करण्याचा [६][राज्य] शासनाचा अधिकार.

**२४.** [५][[६][राज्य] शासनास] [७][**राजपत्रात**] प्रसिद्ध केलेल्या अधिसूचनेद्वारे असा निदेश देण्याचा अधिकार आहे की, कोणत्याही गावास कलम २ अन्वये या अधिनियमाच्या सर्व किंवा कोणत्याही तरतुदी लागू करण्यात आल्या असतील तेव्हा,अशा तरतुदी अशा अधिसूचनेत निर्दिष्ट केलेल्या दिनांकापासून अशा गावातील वळू रेड्यास लागू होतील व असे झाले म्हणजे, अशा रितीने लागू केलेल्या या अधिनियमाच्या तरतुदींत वळू बैलासंबंधी किंवा गाईसंबंधी केलेले उल्लेख अनुक्रमे वळू, रेडे व म्हशी या संबंधी केलेले उल्लेख आहेत, असा त्यांचा अर्थ लावला पाहिजे व त्याप्रमाणे हा अधिनियम त्यास लागू होईल.

---

[१] सन १९६२ चा महाराष्ट्र अधिनियम, ४८ याच्या कलम ८(१) द्वारे हा खंड समाविष्ट करण्यात आला.

[२] वरील अधिनियमाच्या कलम ८(२) द्वारे पोट कलम (२ क) समाविष्ट करण्यात आले.

[३] भारतीय विधि अनुकूलन परिषद आदेशाद्वारे हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

[४] सन १९६२ चा महाराष्ट्र अधिनियम, ४८ याच्या कलम ८(३) अन्वये पोट-कलम (४) समाविष्ट करण्यात आले.

[५] भारतीय विधि अनुकूलन परिषद आदेशाद्वारे मूळ मजकुराऐवजी हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

[६] विधि अनुकूलन आदेश, १९५० याद्वारे मूळ मजकुराऐवजी हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

[७] भारतीय विधि अनुकूलन परिषद आदेशाद्वारे मूळ मजकुराऐवजी हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

पशुपालन व पशुवैद्यक संचालक यांची कृत्ये वैध ठरविणे.

[1][२४ क. या अधिनियमात काहीही अंतर्भूत असले तरी, मुंबई पशुधन सुधारणा (सुधारणा) अधिनियम, १९५० अंमलात आल्याच्या दिनांकापूर्वी, या अधिनियमाअन्वये कृषि संचालकास दिलेले अधिकार चालवून काम करण्याच्या इराद्याने पशुपालन व पशुवैद्य संचालक याने किंवा त्याच्या वतीने केलेली सर्व कृत्ये या अधिनियमाअन्वये किंवा तद्नुसार आवश्यक असल्याप्रमाणे वैधरित्या केलेली आहेत व नेहमी तशी करण्यात आलेली होती, असे समजले पाहिजे व असे कृत्य उक्त पशुपालन व पशुवैद्यक संचालक याने किंवा त्याच्या वतीने अशा दिनांकापूर्वी केलेले होते याच केवळ कारणावरून ते अवैध आहे असे समजता कामा नये किंवा त्यावर आक्षेप घेता कामा नये.] १९५० चा मुंबई ३५.

सन १९५० चा मध्यप्रांत व वऱ्हाडचा अधिनियम क्रमांक २० रद्द करणे व बचाव.

[2][२५. मुंबई पशुधन सुधारणा (व्याप्ति व सुधारणा) अधिनियम, १९६२ याच्या प्रारंभानंतर, महाराष्ट्र राज्याच्या विदर्भ विभागास लागू असलेला मध्यप्रदेश पशुधन सुधारणा अधिनियम, १९५० हा रद्द होईल : १९६२ चा महा. ४८. १९५० चा मध्य-प्रांत २०.

परंतु, उक्त अधिनियम अशा रितीने रद्द करण्यात आल्यामुळे,—

(क) अशा रितीने रद्द केलेल्या अधिनियमाचा पूर्वीचा अंमल ;

(ख) अशा रितीने रद्द केलेल्या अधिनियमान्वये संपादन केलेला किंवा प्राप्त झालेला कोणताही हक्क किंवा पत्करलेले कोणतेही बंधन किंवा जबाबदारी ;

(ग) अशा रितीने रद्द केलेल्या अधिनियमाविरुद्ध केलेल्या कोणत्याही अपराधाच्या संबंधात झालेली कोणतीही शास्ती किंवा शिक्षा ; किंवा

(घ) उपरोक्त कोणताही हक्क, बंधन किंवा जबाबदारी, शास्ती किंवा शिक्षा यांच्या संबंधातील कोणतीही चौकशी, वैध कार्यवाही किंवा उपाययोजना ;

यास बाध येणार नाही आणि जणू काही, मुंबई पशुधन सुधारणा (व्याप्ति व सुधारणा) अधिनियम, १९६२ हा संमत झाला नव्हता असे समजून अशी कोणतीही चौकशी, वैध कार्यवाही किंवा उपाययोजना दाखल करता येईल, चालू ठेवता येईल किंवा अंमलात आणता येईल आणि अशी कोणतीही शास्ती किंवा शिक्षा करता येईल.] १९६२ चा महा. ४८.

---

[1] सन १९५० चा मुंबई अधिनियम ३५ याच्या कलम ९ द्वारे कलम २४ क समाविष्ट करण्यात आले.

[2] सन १९६२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४८ याच्या कलम ९ अन्वये कलम २५ समाविष्ट करण्यात आले.